जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 NOV 2020
लोकमत

## आठवणीतील दिवाळी

# चार-पाच दिवस धमाल असायची

आमचे एकत्र कुटुंब असल्याने आम्ही सख्खे-चुलत अशी १८ बहीण-भावंडे एकत्रितपणे दिवाळी साजरी करायचो. सकाळी लवकर उठून अभ्यंगस्नान करून, नवीन कपडे घालून, फटाके वाजवून, फराळ करायचो. त्यानंतर घरातील ज्येष्ठ मंडळींसमवेत आम्ही नातेवाइकांना दिवाळी देण्यासाठी जात होतो. पाडवा आणि भाऊबीज आम्ही एकाच दिवशी पाडवा ओवाळणी म्हणून साजरी करीत होतो. दिवाळीच्या चार-पाच दिवस आम्हा भावंडांची घरात नुसती धमाल असायची. त्यावेळी दिवाळी संपू नये असे वाटायचे. या आठवणी अविस्मरणीय आहेत.



दिवाळी झाल्यानंतर शेतीच्या कामांत मदत करण्यासाठी आम्ही आवर्जून जात होतो. पुढे शिक्षण, नोकरीनिमित्त आम्ही भावंडे वेगवेगळ्या ठिकाणी गेलो. कुटुंबांचा विस्तार झाला. त्यामुळे फारसे एकत्र येणे होत नाही. पण, दिवाळीला आम्ही आमच्या वाठार तर्फ वडगांव या गावी येतो. दिवाळीत आम्ही गावीच राहतो. ध्वनी आणि हवाप्रदूषण टाळण्यासाठी फटाके वाजविणे आम्ही टाळतो. आमच्या मुलांनाही फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्यास प्रोत्साहित केले आहे. एकत्र फराळ करणे, नातेवाईक आणि गावातील बालमित्रांच्या भेटीगाठी घेणे, त्यांच्याशी गप्पा मारणे हे आर्वजून करतो. या चार दिवसांत मी थोडा निवांत राहतो. वाचन करतो. कुटुंबासमवेत अधिक वेळ व्यतीत करतो.

**डॉ. डी. टी. शिर्के,**
कुलगुरु , शिवाजी विद्यापीठ

1 4 NOV 2020

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या १५० हून अधिक परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाने अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या १५० पेक्षा जास्त परीक्षांचे आठ दिवसांत जाहीर केले आहेत.

परीक्षा विभागाकडून १७२ पैकी १५० हून अधिक अंतिम वर्षाच्या परीक्षांचे निकाल आजअखेर जाहीर झाले आहेत. यात एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., बी.बी.ए., बी.सी.ए., एम.एस.डब्ल्यू., अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, बी.कॉम (आयटी), बायोटेक्नॉलॉजी, पाच वर्ष लॉ (बॅकलॉग), बी.एस्सी. (फूड टेक्नॉलॉजी), मायक्रो बायलॉजी, बी.आर्च अभ्यासक्रमांचा समावेश आहे. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. या अभ्यासक्रमाचे निकाल लवकरच जाहीर होणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 NOV 2020

पुढारी

# विद्यापीठात कर्मचारी महिलेकडून दीड हजार रुपये प्रामाणिकपणे परत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दिवाळीचा सण सुरू झाला असून आपले पैसे हरवले तर त्यात कंत्राटी तत्त्वावर काम करणारे रोजंदारी कर्मचारी असाल तर काय होईल? याचा विचार केल्यावर अस्वस्थ व्हायला होते. मात्र, विद्यापीठ परिसरात सापडलेले १५०० रुपये कंत्राटी कर्मचारी महिलेने प्रामाणिकपणे सुरक्षा विभागाकडे सुपूर्द केले.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचारी सविता श्रीकांत कालेकर यांना गुरुवारी दुपारी विद्यापीठ परिसरात पडलेले १५०० रुपये सापडले. त्यांनी ते प्रामाणिकपणाने विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाकडे सुपूर्द केले.

दुसरीकडे विद्यापीठाच्या दीक्षान्त विभागात काम करणारा सद्दाम इक्बाल मुल्लाणी हा रोजंदारी कर्मचारी १५०० रुपये हरवले म्हणून सैरभैर झाला होता. त्याने विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधला. त्याच्याकडून पैसे हरवल्याचे ठिकाण वगैरे माहितीची शहानिशा करून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पैसे परत देण्यात आले. प्रामाणिकपणाबद्दल कुलसचिवांच्या हस्ते कालेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आस्थापना विभागाचे उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 NOV 2020
लोकमत

# सापडलेले पंधराशे रुपये केले परत

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचारी सविता श्रीकांत कालेकर यांना गुरुवारी दुपारी विद्यापीठ परिसरात पडलेले १५०० रुपये सापडले. त्यांनी ते प्रामाणिकपणाने विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाकडे सुपूर्द केले.

दिवाळी सणाच्या तोंडावर प्रामाणिकपणावरचा विश्वास बळकट करणारी घटना विद्यापीठात घडली. विद्यापीठाच्या दीक्षान्त विभागात काम करणारा सद्दाम इक्बाल मुल्लाणी हा रोजंदारी कर्मचारी १५०० रुपये हरवले म्हणून सैरभैर झाला होता. त्याने विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधला. त्याच्याकडून पैसे हरवल्याचे ठिकाण वगैरे माहितीची शहानिशा करून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पैसे परत देण्यात आले.

प्रामाणिकपणाबद्दल कुलसचिवांच्या हस्ते कालेकर यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी आस्थापना विभागाचे उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.